SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR- 416 004, MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – 416004 महाराष्ट्र
वेबसाईट : www.shivajiuniversity.com व www.unishivaji.ac.in
Direct : 0091-0231-2693176 FAX : 0091-0231-2690655
E-mail : coe@unishivaji.ac.in
दूरध्वनी :– परीक्षा नियंत्रक कार्यालय 0231-2609068

A
Re-accredited by NAAC (2014)
With CGPA-3.16

Ref. No. SU/Exam/CAP/ 4101 Date :26 /11/2015

# परिपत्रक

सर्व संलग्नित बी.ए.,बी.कॉम,बी.एस्सी,बी.सी.एस.,बी.बी.ए,व बी.सी.ए. महाविद्यालयातील प्राचार्य/प्राचार्या/संचालक यांना कळविण्यात येते की, ऑक्टोंबर/नोव्हेंबर,2015 या सत्रातील परीक्षांचे मुल्यमापनाचे कामकाज सुरु असून. परीक्षेचे निकाल विहित वेळेत घोषित होण्यासाठी येणा–या अडचणी विचारात घेता खालील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी ही विनंती.

1. मा. प्राचार्य व वरिष्ठ पर्यवेक्षक यांनी मूल्यमापन केंद्रावर आपल्या महाविद्यालयातील पाठविलेल्या उत्तरपत्रिकेंच्या विषयांची माहिती घेवून त्या विषयाच्या नियमित प्राध्यापकांना अन्य परीक्षेच्या/महाविद्यालयाच्या कामातून कार्यमुक्त करून तात्काळ आपल्या जिल्हयांशी संलग्नित मध्यवर्ती मूल्यमापन केंद्रावर मूल्यांकनाच्या कामासाठी प्राध्यान्याने पाठविण्यात यावे.
2. आपल्या महाविद्यालयातील पदवी द्वितीय व तृतीय वर्षाच्या परीक्षार्थींच्या उत्तरपत्रिका मध्यवर्ती मूल्यमापन केंद्रावर पाठविल्यापासून जास्तीत जास्त 20 दिवसात मूल्यांकनाचे कामकाज पूर्ण करून घेण्याची जबाबदारी आपण व्यक्तीशः घ्यावी व आपल्या महाविद्यालयातील शिक्षकांना **कार्यरत रजा (ऑन डयुटी )** मुल्यमापन कामासाठी सोडावे.संबधित मुल्यमापन केंद्रावरील आपल्या महाविद्यालयातील उत्तरपत्रिका संख्येपेक्षा 10% उत्तरपत्रिका जादा प्रमाणात तपासून संबधित प्राध्यापकांनी मुल्यमापन कामी सहकार्य करावे.तसेच संबधित प्राचार्य यांनी आपल्या महाविद्यालयातील कमीत कमी 3 व 5 वर्ष अनुभव असणा–या प्राध्यापकांना मुल्यमापनकामी संबधित कॅप सेंटरवर पाठविणेची व्यवस्था करावी व तशी यादी परीक्षक नियुक्ती विभागाकडे पाठवावी.
3. तसेच संबंधित मूल्यमापन केंद्रावरून आवश्यकतेनुसार आणखी परीक्षक/परीनिरीक्षक यांची मागणी असल्यास त्यांना प्राधान्याने पाठविण्यात यावे.
4. परीक्षार्थींच्या उत्तरपत्रिका तपासण्याच्या कामी जे शिक्षक टाळाटाळ करतील अशा शिक्षकांची नांवे विद्यापीठास कळविण्यात यावीत जेणेकरून त्यांच्यावर विद्यापीठ नियमानुसार कारवाई करणे शक्य होईल.
5. मूल्यांकनाचे कामकाज पूर्ण झाल्यानंतर आपल्या महाविद्यालयातील परीक्षक/परीनिरीक्षक यांनी केलेल्या मूल्यांकनाच्या कामकाजाची तपशीलवार माहिती कॅप विभाग, परीक्षा भवन क्रं. 2, शिवाजी विद्यापीठ यांचेकडे पाठविण्यात यावी.
6. परीक्षेचे कामकाज पूर्ण होताच आपल्या महाविद्यालयातील को–या उत्तरपत्रिकांचा हिशेब गोडावून विभागास सादर करावा.
7. आपल्या महाविद्यालयास दिलेल्या को–या उत्तरपत्रिका हया योग्य पध्दतीने रॅक मध्ये ठेवाव्यात व योग्य त्या नोंदी ठेवून त्याचा वापर करावा.
8. परीक्षा कामकाजाशी निगडीत सर्व रजिस्टर्स योग्य त्या नमुन्यात घालावीत व ती प्रत्यक्ष कामकाजात आणावीत.
9. जर आपल्या महाविद्यालयात जुन्या उत्तरपत्रिका व स्टेशनरी शिल्लक असेल तर ती तात्काळ गोडावून विभागाशी संपर्क करुन त्यांचेकडे परत करावी.
10. कोल्हापूर,सातारा व सांगली या जिल्हयांतील **बी.एस्सी. परीक्षेच्या भाग –3 च्या सत्र 5 व 6** च्या इंग्रजी नियमित व केमिस्ट्री पेपर क्रमांक 9,10,11,12,13 व 14 या सर्व पेपर, स्टॅट पेपर क्रमांक 9,10,11,12,13 व 14 विषयांकरीता आपल्या महाविद्यालयातील परीक्षक व परीनिरीक्षक यांना पेपर तपासणी कामी कार्यरत रजेवर पाठविणेची व्यवस्था करावी.

    तसेच बी.ए. **भाग –3 च्या सत्र 5 व 6** परीक्षेच्या इग्रंजी नियमित व अर्थशास्त्र या विषयाकरीता आपल्या महाविद्यालयातील शिक्षकांना आपल्या जिल्हयांच्या संलग्नित असणा–या कॅप सेंटरवर मुल्यमापन कामी कार्यरत रजेवर तात्काळ पाठवून सहकार्य करावे. आपण आपल्या महाविद्यालयातील ज्या शिक्षकांना मूल्यमापन कामी पाठविणार आहात त्यांची विषयनिहाय यादी तात्काळ या विभागास पाठवावी.

    विद्यापीठ कायदा 1994 कलम 72 नुसार परीक्षांचे सत्रनिहाय परीक्षा संपलेच्या तारखेपासून निकाल 30 दिवसांत लावणे बंधनकारक असलेने वरील बाबीचा गांभीर्याने विचार करुन आपल्या महाविद्यालयातील प्राध्यापकांना प्राध्यान्याने भाग 2 व 3 सत्र 3,4,5 व 6 च्या मुल्यमापन कामी पाठविणेची व्यवस्था करावी. ही विनंती.

आपला विश्वासू,

श्री. एम.ए.काकडे
(मा. परीक्षा नियंत्रक)